पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे –३८

दि.१६/०३/२०२०

## विद्यार्थी विकास मंडळ

## शैक्षणिक वर्ष २०१९–२० या शैक्षणिक वर्ष अहवाल

### १) कमवा व शिका योजनाः–

महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षाकरीता राबविण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांना सूचना देवून अर्ज मागविण्यात आले. व २६ विद्यार्थ्यांची सदर योजनेकरीता निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या विविध विभागामध्ये कामकाजाचे वाटप करून दिले. त्याप्रमाणे सदर विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२० पर्यंत कार्यालय, ग्रंथालय, संगणकशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग व अर्थशास्त्र विभागामध्ये कामकाज केले. सदर योजनेमध्ये काम केलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१९–२० मध्ये रू.१,९६,३८०/–रकमेचे वाटप करण्यात आले.

### २) ''वृक्षारोपण कार्यक्रम ''–

महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने दिनांक–२४/०९/२०१९ रोजी वृक्षारोपण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. त्यामध्ये महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.लक्ष्मण उर्किडे, डॉ.निता कांबळे, प्रा.भरत राठोड व प्रा.अशोक शेळके उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक यांनी केले.

### ३) ''सांगली–कोल्हापूर पूरग्रस्तासाठी मदतनिधी फेरीचे आयोजन'' –

सांगली– कोल्हापूर आलेल्या पूर परिस्थितीमुळे अनेक कुटुंबाना स्थलांतरीत व्हावे लागले. त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे सदर भागातील लोकांना मदत करण्यासाठी महाविद्यालयांच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मदतनिधी फेरीचे मा.प्राचार्य डॉ.सुषमा भोसले यांचे मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. त्यामध्ये मा.प्राचार्य व महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आर्थिक स्वरूपात मदत केली. सदर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.लक्ष्मण उर्किडे, प्रा.अशोक शेळके, प्रा.भरत राठोड यांनी केले.

### ४) निर्भय कन्या अभियान कार्यक्रम अहवालः–

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाने कळविल्यानुसार महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था श्री सिध्दीविनायक महिला महाविद्यालयात दिनांक–११/०२/२०२० रोजी निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील १३ विद्यार्थीनी तसेच विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक यांनी सहभाग घेतला. सदर कार्यशाळेत विद्यार्थीनींना सायबर सुरक्षा, आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## ५) राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमः–

महाविद्यालयात दिनांक–२५/०१/२०२० रोजी मा.प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक यांनी केले. डॉ.भरत राठोड यांनी पाहुण्यांचा परिचर करून दिला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीम.दिप्ती रिठे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार कोथरूड व अनंत पिसे नायब तहसिलदार कोथरूड उपस्थित होते. म्हणून कोथरूड मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी तसेच मतदानासंबंधी माहिती देण्यात आली. याप्रसंगी कोथरूड मतदार विधानसभा मतदार संघामध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी नोडल अधिकारी व बीएलओ यांचा सत्कार करण्यात आला. डॉ.एस.बी.शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एन.बी.कांबळे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले.

## ६) कार्यशाळा अहवालः–

1) **Workshop on Best from Waste**:-

महाविद्यालयात दिनांक– २४ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने Best from Waste या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये श्रीम.उज्ज्वला भोसले व श्रीम.प्रभा दळवी यांनी विद्यार्थ्यांना टाकाऊ कापडापासून विविध प्रकारच्या टिकाऊ वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. त्याचबरोबर सी.डी.पासून विविध प्रकारच्या शोभेच्या व कलाकुसरीच्या वस्तू तयार करण्यात आल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंचे कौतुक केले. व विद्यार्थ्यांचा सत्कार केला. सदर कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक प्रा.दिपश्री पोखलेकर यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रा.निता देशमुख, प्रा.किरण गाढवे, प्रा.वर्षा वरपे व विद्यार्थी विकास अधिकारी यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून रू.५,०००/– अनुदान प्राप्त झाले.

2) **Workshop on Competative Exam :-**

महाविद्यालयात दिनांक–२० ते २२ जानेवारी २०२० या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन निवृत्त उपजिल्हाधिकारी श्री.ज्ञानदेव ठुबे यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्पर्धापरीक्षेची पूर्वतयारी तसेच प्रशासकीय सेवा यासंबंधी माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्व अधोरेखित केले. स्पर्धा परीक्षेचे महत्व सांगताना सध्याच्या काळातील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करावा. तसेच आपले ध्येय निश्चित करावे. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य महाविद्यालयामार्फत केले जाईल असे सांगितले. सदर कार्यशाळेत श्री.मिलींद पाटील, श्री.शैलेश कोळेकर व श्रीम.स्नेहा पाटील यांनी विद्यार्थ्यांना विषयनिहाय सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन स्पर्धा परीक्षा केंद्र समन्वयक डॉ.रूपाली शेंडकर, प्रा.स्वाती शिंदे व विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक

यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयात रू.७,०००/– अनुदान प्राप्त झाले.

3) **Workshop on NET/SET Exam:-**

महाविद्यालयात दिनांक–२७ व २८ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने नेट/सेट मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ.एस.पी.डाकले यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे यांनी सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील बदल, नवीन तंत्रज्ञान यासंबंधी माहिती दिली. तसेच सदर परीक्षेचे महत्व त्याचा सदर परीक्षेबरोबरच स्पर्धा परीक्षेसाठी होणारा फायदा याविषयी विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित केले.

सदर कार्यशाळेत प्रा.प्रविण कड यांनी पेपर–१ वर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.यु.बी.लंगोटे यांनी गणित व संख्याशास्त्र संबंधी प्रश्नाचे निरसन केले. प्रा.संजय कप्तान व प्रा.चंदन सिंह यांनी पेपर १ बरोबरच पेपर १ विषयी विषयनिहाय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन मा.प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सुनिता डाकले, प्रा.तानाजी जाधव, प्रा.सुवर्णा कांबळे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयात रू.८,०००/– अनुदान प्राप्त झाले.

विद्यार्थी विकास मंडळमार्फत राबविले जाणारे कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत राबविले जातात. त्यानुसार विद्यापीठाकडून येणाऱ्या विविध परिपत्रकाची कार्यवाही मा.प्राचार्य यांचे सूचेननुसार करण्यात आली.

**वरील सर्व सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षामधील कार्यक्रम मा.प्राचार्य डॉ.बी.एन.झावरे यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सर्व कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक यांनी केले.**